# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

### **वाणिज्य विभाग**

प्रभात पुणे, सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०१७

## ग्राहक संरक्षण कायद्याचा आधार घ्यावा

### रमेश टाकळकर : हुतात्मा राजगुरू वाणिज्य मंडळाचे उद्घाटन



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित वाणिज्य मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना रमेश टाकळकर.

माय पुणे जिल्हा ६ पुढारी | पुणे, मंगळवार १९ सप्टेंबर २०१७

## ग्राहक संरक्षण कायद्याचा आधार घ्यावा

### रमेश टाकळकर यांचे आवाहन



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना रमेश टाकळकर.

संध्या
शनिवार, २३ सप्टेंबर २०१७ | ४

# ग्राहक सरक्षण कायद्याचा आधार घ्यावा

राजगुरुनगर : जागतिकीकरणामुळे ग्राहक केंद्रित बाजारपेठ निर्माण झाली असून ऑनलाईन शॉपिंगच्या पर्यायासह बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नामांकित ब्रँड्स आज सहजपणे बाजारात उपलब्ध होत आहेत यातून ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता असून आपल्या ग्राहकहिताचे रक्षण करण्यासाठी ग्राहकांनी ग्राहक संरक्षण कायद्याचा आधार घ्यावा असे आवाहन खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित वाणिज्य मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, ग्राहक मंचाचे सतिश नाकोरे, वाणिज्य मंडळ प्रमुख डॉ. एम. एन. जरे, डॉ. टी.जी.गिते, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, ग्राहकांना सुरक्षा, उत्पादनाबाबत माहितीचा, निवडीचा आणि ग्राहक शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. विद्यार्थी व नागरिकांनी जागरूकतेने आपल्या अधिकारांचा वापर करावा. यावेळी रमेश टाकळकर यांनी जागरूक ग्राहक हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असतो असे सांगितले. शासनाच्या सामाजिक, आर्थिक निर्णयांचा परिणाम थेट ग्राहकांवर होत असतो. विमा योजना, बँकेतील व्याजदरातील कपात, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीतील दरवाढ, अन्नपदार्थातील भेसळ, वजनकाट्यातील फसवणूक, फसव्या जाहिराती, ग्राहकांना आकर्षित करणाऱ्या अनेक योजना तसेच खरेदी विक्रीतील फसगत अशा अनेक समस्यांना ग्राहक सातत्याने बळी पडत असतो. या अन्यायाविरुध्द ग्राहकांनी ग्राहक तक्रार मंचाच्या माध्यमातून ग्राहक संरक्षण कायद्याचा लाभ घ्यायला हवा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. एम.एन.जरे यांनी, सूत्रसंचालन कु. धनश्री वाटेकर यांनी तर आभार डॉ. टी. जी. गिते यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख